मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५०२ वा ● शुक्रवार, ता. २३ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## बांगलादेशचा भारतातील टी-२० वर्ल्डकपवर बहिष्कार

### बीसीबी आणि बांगलादेश मंत्र्यांच्या बैठकीत निर्णय

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भारतामध्ये होणाऱ्या टी-२० वर्ल्डकप सामन्यांबाबत बांगलादेशने अखेर मोठा निर्णय घेतला असून भारतात सामने खेळणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. बांगलादेश क्रिकेट मंडळ (बीसीबी) आणि सरकारी मंत्र्यांच्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे वृत्त आहे. बांगलादेशने सुरक्षेच्या कारणावरून आपले सामने भारताबाहेर हलवावेत, अशी मागणी यापूर्वी आयसीसीकडे केली होती. मात्र आयसीसीने स्पर्धेचे नियोजन पूर्ण झाल्यामुळे सामने अन्यत्र हलवणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले. यानंतरही बांगलादेश आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने आयसीसीने अंतिम निर्णयासाठी मुदत दिल्याचे सांगितले जात आहे. बैठकीनंतर बांगलादेश सरकारने ''सुरक्षेच्या मुद्द्यावर आम्ही चिंता व्यक्त केली होती. मात्र आयसीसीकडून बदल न झाल्याने आम्हाला वर्ल्डकपवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घ्यावा लागत आहे,'' अशी भूमिका मांडल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आता बांगलादेश भारतातील टी-२० वर्ल्डकपमध्ये खेळणार नसल्याची शक्यता बळावली आहे. या घडामोडींनंतर आयसीसी पुढील निर्णय काय घेणार, तसेच स्पर्धेतील जागा रिक्त झाल्यास पर्यायी संघाला संधी दिली जाणार का, याकडे क्रिकेट विश्वाचे लक्ष लागले आहे.



## महापालिकेनंतर झेडपीतही बिनविरोधचा ट्रेंड

### भाजपच्या दोन जागा बिनविरोध

**सिंधुदुर्ग । रयत समाचार**

नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपाच्या अनेक जागा बिनविरोध निवडून आल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. त्यानंतर आता राज्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्येही बिनविरोधच्या माध्यमातून भाजपाचे खाते उघडले आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपाच्या पंचायत समितीच्या दोन जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. वैभववाडी तालुक्यातील कोकिसरे आणि कणकवली तालुक्यातील बिडवाडी या पंचायत समिती गणांमधून भाजपाच्या उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. वैभववाडी तालुक्यातील कोकिसरे पंचायत समिती गणामध्ये भाजपाच्या साधना नकाशे यांनी अधिकृतपणे उमेदवारी अर्ज दाखल केला असून त्यांच्यासोबत भाजपाच्या अक्षता डाफळे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या दोन अर्जांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोकिसरेमधून भाजपाचा बिनविरोध विजय जवळपास निश्चित मानला जात आहे. तर कणकवली तालुक्यातील बिडवाडी पंचायत समिती गणामध्येही भाजपाच्या उमेदवाराची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. बिडवाडीमध्ये भाजपाच्या उमेदवार संजना राणे यांनी उद्धवसेनेच्या उमेदवार विद्या शिंदे यांना २०१४ नंतर तीन अपत्ये झाल्याचा मुद्दा उपस्थित करत हरकत घेतली. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी विद्या शिंदे यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवला. त्यामुळे भाजपाच्या संजना राणे यांचा विजयही निश्चित झाला आहे. अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच भाजपाच्या खात्यात दोन जागा जमा झाल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतही बिनविरोधचा ट्रेंड वाढल्याची चर्चा होत आहे.



## 'स्वयंपूर्ण गोवा' संकल्पनेतून हस्त व्यवसायिकांना बळ - मंत्री डॉ. तवडकर

**काणकोण । रयत समाचार**

काणकोण तालुक्यातील इद्दरलोलयें येथे असलेल्या शासकीय सुतारकाम-सह-सामायिक सुविधा केंद्राच्या नूतनीकरण व नव्या बांधकाम कामांचा भूमिपूजन सोहळा कला व संस्कृती खात्याचे मंत्री तथा आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. रमेश तवडकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. या प्रकल्पांतर्गत साठवणूक कक्ष, शेड, प्रवेश रस्ता तसेच कंपाउंड भिंत उभारण्यात येणार असून यासाठी सुमारे ७५ लाख रुपयांचा खर्च करण्यात येत आहे. या नूतनीकरणामुळे केंद्राची भौतिक सुविधा अधिक सक्षम होऊन स्थानिक कारागीर, सुतार तसेच हस्तकला व्यावसायिकांना मोठा लाभ होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या मंत्री तवडकर यांनी आपल्या मनोगतात ''स्वयंपूर्ण गोवा'' या संकल्पनेवर सविस्तर भाष्य करत सांगितले की, गोवा सरकार स्थानिक कारागीर, हस्तव्यवसायिक आणि पारंपरिक उद्योगांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहे. हँडलूम, कुंभी साडी व शाल यांसारख्या पारंपरिक कलांच्या माध्यमातून सामान्य लोकांच्या हाताला काम मिळावे, त्यांना योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी आणि त्यांच्या उत्पादनांना योग्य मूल्य मिळावे, यासाठी सरकार सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकार केवळ योजना जाहीर करून थांबत नाही, तर त्या प्रत्यक्षात उतरवून स्थानिकांना आर्थिक पाठबळ देण्याचे कार्य करत असल्याचे सांगत त्यांनी या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास पैंगिण जिल्हा पंचायत सदस्य अजय लोलयेंकर, लोलीयेम पंचायतीच्या सरपंच निशा च्यारी, उपसरपंच आशुतोष बांदेकर, पंचायतीचे सदस्य सुप्रिया पागी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत करत केंद्राच्या नूतनीकरणामुळे परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रम शांततापूर्ण व उत्साही वातावरणात संपन्न झाला.

> **सुविधा केंद्राच्या नूतनीकरणामुळे स्थानिक सुतार, लघुउद्योगिक, स्वयंरोजगार करणारे युवक व महिलांना एकत्रितपणे काम करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळेल.**
>
> **-डॉ. रमेश तवडकर,**
> कला व संस्कृती मंत्री

## युद्ध थांबलेच पाहिजे- डोनाल्ड ट्रम्प

### दावोस परिषदेत ट्रम्प-झेलेंस्की भेट, लवकरच पुतिन यांचीही भेट

**दावोस । रयत समाचार**

जागतिक आर्थिक मंचाच्या (WEF) दावोस येथील वार्षिक बैठकीदरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेंस्की यांची भेट घेतली. दावोस येथून रवाना होण्यापूर्वी ट्रम्प यांनी ''येथे झेलेंस्की यांची भेट झाली असून लवकरच रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचीही भेट होईल. हे युद्ध संपलेच पाहिजे,'' असे सांगितले. या बैठकीदरम्यान ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय संघर्षांचे निराकरण करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या 'बोर्ड ऑफ पीस' या संस्थेच्या सनदेलाही स्वाक्षरी केली. ट्रम्प यांच्या निमंत्रणाला अर्जेंटिना, आर्मेनिया, अझरबैजान, बहरीन, बेलारूस, इजिप्त, हंगेरी, कझाकस्तान, मोरोक्को, पाकिस्तान, यूएई आणि व्हिएतनाम या देशांनी प्रतिसाद दिला आहे. तर चीन, जर्मनी, इटली, पॅराग्वे, रशिया, स्लोव्हेनिया, तुर्किये आणि युक्रेन यासह काही देशांनी या प्रस्तावावर अद्याप ठाम भूमिका घेतलेली नाही. दावोस परिषदेत ट्रम्प यांच्या भाषणात ग्रीनलँडवर नियंत्रण मिळवण्याचा विषयही चर्चेत राहिला. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षेसाठी ग्रीनलँड आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, भारताचे माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मोठ्या 'लार्ज लँग्वेज मॉडेल्स' (LLMs) तयार केल्यानेच देशांना भू-राजकीय आघाडी मिळते, असे नाही, असे मत व्यक्त केले. एआयमध्ये होत असलेल्या मोठ्या गुंतवणुकीचा लाभ तोच देश घेईल, जो त्याचा प्रभावी वापर करून फायदेशीर पद्धतीने अंमलबजावणी करू शकेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.




## महानगरपालिकांत महिलाराज

### १५ जागी महिला महापौर

**मुंबई । रयत समाचार**



राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदाची आरक्षणाची सोडत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत काढण्यात आली असून २९ महापालिकांपैकी १५ महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. यावेळी नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज उपस्थित होते. राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एकच पद आरक्षित होत असून नियमातील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी पद देय होत नाही. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ३ पदे आरक्षित झाली असून त्यापैकी २ पदे अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी ८ पदे आरक्षित असून त्यापैकी ४ पदे नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) प्रवर्गासाठी राखीव झाली आहेत. उर्वरित १७ महानगरपालिकांमधून सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी ९ पदे येत असून त्यापैकी ८ पदे खुला (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत.

#### महापौर पदासाठी आरक्षण

**अनुसूचित जमातीसाठी राखीव महापालिका :** कल्याण-डोंबिवली.

**अनुसूचित जातीसाठी राखीव महापालिका :** ठाणे (सर्वसाधारण), जालना (महिला), लातूर (महिला).

**नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला आरक्षण):** जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर, अकोला.

**नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण):** पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर, उल्हासनगर.

**सर्वसाधारण महिला आरक्षण :** पुणे, धुळे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मीरा-भाईंदर, नागपूर, **नाशिक.**

**सर्वसाधारण प्रवर्ग :** छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, भिवंडी-निजामपूर.




## बत्ती गुल, नेटवर्क गायब; जिओ टॉवर बनला 'शोभेची बाहुली'

**नगर तालुका । रयत समाचार**

तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील रिलायन्स जिओ कंपनीचा टॉवर 'शोभेची बाहुली' बनला असून वीज पुरवठा खंडित होताच नेटवर्क पूर्णपणे गायब होत आहे.

त्यामुळे स्थानिक ग्राहक, ऑनलाइन अभ्यास करणारे विद्यार्थी आणि विविध व्यावसायिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही समस्या कायम असून कंपनीकडून अद्याप कोणताही ठोस उपाय करण्यात आलेला नाही. पिंपळगाव माळवी हे ग्रामीण भागातील छोटेसे गाव असून येथे जिओचे सुमारे २ हजारहून अधिक ग्राहक आहेत. गावाच्या मध्यभागी उभारलेला मुख्य टॉवर वीज पुरवठ्यावर पूर्णपणे अवलंबून आहे. ''वीज गेली की टॉवर बंद पडतो आणि नेटवर्क शून्य होतो. बॅकअप पॉवर सिस्टम नसल्यामुळे ही समस्या वारंवार उद्भवते,'' असे स्थानिक रहिवासी व जिओ ग्राहक पत्रकार खासेराव साबळे यांनी सांगितले. त्यांच्या मते, गेल्या १० वर्षांपूर्वी उभारलेल्या या टॉवरमध्ये जनरेटर किंवा बॅटरी बॅकअपची व्यवस्था नसल्यामुळे हा त्रास वाढला आहे.

कोरोना काळानंतर ऑनलाइन शिक्षणाची सवय लागलेल्या विद्यार्थ्यांना या समस्येचा मोठा फटका बसत आहे. गावातील शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी ऑनलाइन लेक्चर्स, परीक्षा व असाइनमेंटसाठी इंटरनेटवर अवलंबून आहेत.

''माझ्या मुलीचा अभ्यास पूर्णपणे ऑनलाइन आहे. वीज गेली की नेटवर्क गायब होतं आणि क्लास मिस होतो. त्यामुळे तिच्या अभ्यासात अडथळा येतो,'' अशी खंत पालक सुनील झिने यांनी व्यक्त केली. परिसरातील दुकानदार, शेतकरी आणि छोटे उद्योजकही या समस्येने त्रस्त आहेत. ऑनलाइन पेमेंट, डिजिटल बँकिंग तसेच सोशल मीडियावर आधारित व्यवसाय प्रभावित होत आहेत. जिओ कंपनीने यावर उपाय करावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



पिंपळगाव माळवी येथील जिओ टॉवरमधील नादुरुस्त अवस्थेतील जनरेटर

एक्स्प्रेस फोटो

## मराठी मनोरंजनाचा समृद्ध खजिना घेऊन 'नाफा स्ट्रीम'ची नॉर्थ अमेरिकेत धडाकेबाज एंट्री

**सॅन होजे । राम कोंडीलकर**

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त 'देऊळ' आणि 'भारतीय' या गाजलेल्या चित्रपटांचे निर्माते, अभिजित घोलप, यांच्या संकल्पनेतून स्थापन झालेल्या नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशन अर्थात 'नाफा' (NAFA) या संस्थेने नववर्षात अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल उचलले आहे. कोणताही आर्थिक लाभ न घेता, स्वयंसेवकांच्या निष्ठा, समर्पण आणि कलाप्रेमावर उभी राहिलेली ही नो-प्रॉफिट संस्था आता आपल्या खास मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म 'नाफा स्ट्रीम'च्या माध्यमातून नॉर्थ अमेरिकेतील मराठी रसिकांच्या भेटीला आली आहे. नुकताच लाँच झालेला 'नाफा स्ट्रीम' हा ओटीटी प्लॅटफॉर्म उत्तर अमेरिका व कॅनडामधील प्रेक्षकांसाठी वेब, रोकु, आयओएस आणि अँड्रॉइड या सर्व माध्यमांवर उपलब्ध झाला आहे. मराठी चित्रपट, लघुपट, डॉक्युमेंट्री, वेबसीरिज आणि मास्टरक्लासेसचा दर्जेदार खजिना एकाच छताखाली आणण्याचे ध्येय या प्लॅटफॉर्मचे वैशिष्ट्य ठरते. उत्तर अमेरिका व कॅनडामधील मराठी प्रेक्षकांसाठी नाफा स्ट्रीम हे मराठी मनोरंजनाचे हक्काचे OTT platform ठरणार आहे ! 'नाफा स्ट्रीम'वर NAFA मास्टरक्लास, कल्ट क्लासिक, तसेच नव्या दमदार चित्रपटांचा समावेश असणार आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रेक्षकांना एक्स्क्लुझिव्ह 'वर्ल्ड डिजिटल प्रीमियर' पाहण्याची संधी मिळणार आहे. राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त 'देऊळ', 'कासव', 'दिठी', तसेच 'धूसर', 'अनाहत', 'परतु', 'एक निर्णय',छबीला,यांसारखे दर्जेदार चित्रपट, वादग्रस्त ठरलेला 'मनाचे श्लोक (तू बोल ना)' आणि नुकताच सुपरहिट ठरलेला 'कुर्ला टू वेंगुर्ला' यांचा वर्ल्ड प्रीमियर हे विशेष आकर्षण ठरणार आहे. विशेष म्हणेज 'नाफा स्ट्रीम'वर दर्जेदार मराठी माहितीपटांचा समावेश करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय 'नाफा'ने घेतला आहे.'त्यामध्ये राष्टीय पुरस्कार प्राप्त बोलपटाचा मूकनायक, ही प्रभात फिल्म कंपनीच्या विष्णूपंत दामले ह्यांच्या आयुष्यावर आधारित माहितीपट, गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी गावाने अवलंबलेली 'participatory democracy ह्या बद्दलचा दिशा स्वराज्याची, इत्यादींचा समावेश आहे. हायाशिवाय 'नाफा क्रिएटर्स' म्हणजेच अमेरिकेत स्थायिक मराठी कलावंतांनी साकारलेल्या 'डिअर प्रा', पायरव,, 'निर्माल्य, 'योगायोग', या विविध फ`स्टिवल्स मध्ये गौरवलेल्या शॉर्टफिल्म्स सुद्धा ओटीटीवर पहायला मिळणार आहे. 'नाफा स्ट्रीम'च्या वार्षिक सदस्यत्वासाठी विविध पर्याय उपलब्ध असून, नाफा संस्थेच्या सर्व सभासदांना २० टक्के विशेष सवलत देण्यात येणार आहे. 'नाफा स्ट्रीम'चे संस्थापक अध्यक्ष अभिजित घोलप म्हणाले, ''मराठी सिनेमा हा केवळ मनोरंजन नाही, तर तो आपल्या संस्कृतीचा, विचारांचा आणि संवेदनशीलतेचा आवाज आहे. 'नाफा स्ट्रीम'च्या माध्यमातून हा आवाज जागतिक पातळीवर पोहोचावा, निर्मात्यांना सन्मानजनक व्यासपीठ मिळावे आणि प्रेक्षकांना दर्जेदार आशय एका क्लिकवर उपलब्ध व्हावा, हाच आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे,'' असे मत घोलप यांनी व्यक्त केले. 'नाफा स्ट्रीम' बद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रोजेक्ट लीड अर्चना सराफ यांनी सांगितले, '' नॉर्थ अमेरिकेतील मराठी प्रेक्षकांसाठी सहज सोप्या पद्धतीने, एका अँपच्या माध्यमातून, जुन्या- नवीन, नॉस्टॅल्जिक-कॉन्टेम्परारी ,मनाला वाटेल तश्या मराठी मनोरंजनाचा आस्वाद घेता यावा म्हणून टेक्नॉलॉजी, कंटेंट आणि कलावंत यांचा सुंदर मेळ साधून ,आम्ही एक उत्तम प्लॅटफॉर्म उभा केल्याचा आम्हाला आनंद आहे,''. 'नाफा स्ट्रीम' दर्जेदार आशय, कलावंतांना मिळणारा सन्मान आणि प्रेक्षकांचा विश्वास या त्रिसूत्रीवर उभा राहिलेला हा प्लॅटफॉर्म मराठी चित्रपटसृष्टीसाठी नवी दिशा, नवे बळ आणि नवे आंतरराष्ट्रीय क्षितिज उघडणारा ठरणार असून, 'नाफा स्ट्रीम'च्या माध्यमातून मराठी सिनेमा आता खऱ्या अर्थाने जगाच्या पडद्यावर झळकणार आहे.



# अल-करम हॉस्पिटलमध्ये सर्वरोग निदान शिबिर

## प्रजासत्ताक दिनानिमित्त २७ जानेवारीला आयोजन




अल करम हॉस्पिटल सर्वरोग निदान उपचार शिबिर

**या शिबिरात मोफत ओ.पी.डी., शुगर तपासणी, रक्तगट तपासणी, रक्तातील थायरॉईड, चरबी (लिपिड प्रोफाइल) तपासणी करण्यात येणार आहे. तसेच सोनोग्राफी, एक्स-रे, लॅब टेस्ट इत्यादींवर ४० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार असल्याचे डॉ. जहीर मुजावर यांनी सांगितले.**

**अहमदनगर । आबीद खान**

अल-करम हॉस्पिटल व पटेल स्पेशालिटी क्लिनिकच्या वतीने भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मंगळवार ता. २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत अल-करम हॉस्पिटल, इंगळे मेडिकल जवळ, रविराज आर्केड, किंग्जगेट रोड, अहमदनगर येथे मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती डॉ. जहीर मुजावर यांनी दिली.

या शिबिरात रुग्णांची तपासणी डॉ. अशपाक पटेल (एमबीबीएस, एमडी मेडिसीन), डॉ. जैनब पटेल (एमबीबीएस, एमएस सर्जन), डॉ. जहीर मुजावर (बीएएमएस, एम.एस्सी., पीएचडी, मेडिकल फार्माकॉलॉजी), डॉ. नजमा जहीर (बीयुएमएस, सीसीएच, सीजीओ) हे करणार आहेत.

या शिबिरात (हार्निया, अपेंडीक्स व इतर सर्व शस्त्रक्रिया), कार्डियाक (कॅथलॅब, ॲन्जिओप्लास्टी), युरोलॉजी (डायलिसीस, किडनी स्टोन, प्रोस्टेट सर्जरी), मेडिकल (डायबेटिस, हृदयाचे आजार, स्ट्रोक, ब्लडप्रेशर), आर्थोपेडिक (सांधेदुखी, पाठदुखी, सांधे प्रत्यारोपण), स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र (वंध्यत्व निवारण, वेदनाविरहित प्रसुती), बालरोग व नवजात रोगशास्त्र, ऑन्कोलॉजी (सर्जरी व किमोथेरपी), पॅथॉलॉजी, रेडिओलॉजी, सिटीस्कॅन (स्त्रीरोग/वंध्यत्व निवारण) आदी आजारांची तपासणी केली जाणार असल्याचे डॉ. अशपाक पटेल यांनी सांगितले. तरी या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी ९८६०७०८०१६ / ९९२१९९१४९२ / ०२४१-२४२३३३३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. जहीर मुजावर यांनी केले आहे.



# युवकांना तंत्रज्ञान विकासाची मोठी संधी- देशमुख

## ५ कोटींचे इन्क्युबेशन व इनोव्हेशन सेंटर उभारणार

**आयटीआयच्या प्रांगणात सुमारे पाच हजार चौरस फूट क्षेत्रफळाची इमारत उभारण्यात येणार असून, नाविन्यपूर्ण व अद्ययावत उपकरणांसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा नियोजन मंडळाच्या १२ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत दोन कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील विद्यार्थी व युवकांना आपले कौशल्य व तांत्रिक ज्ञान विकसित करण्याची मोठी संधी मिळणार असल्याचेही देशमुख यांनी सांगितले.**

**अहमदनगर । समीर मन्यार**

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने अहिल्यानगर शहरात पाच कोटी रुपये खर्चाचे इन्क्युबेशन व इनोव्हेशन सेंटर उभारण्यात येणार असल्याची माहिती कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी दिली.

कै. माणिकराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), अहिल्यानगर येथे आयोजित जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनाचे उद्घाटन देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, आयटीआयचे प्राचार्य खालीद जहागीरदार, चंद्रकांत काळोखे, सोमनाथ जाधव, अजय वाघ, गणेश हडतगुणे, मुकुंद महामुनी, कुमावत तसेच विविध तांत्रिक विद्यालयांचे प्राचार्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना देशमुख म्हणाले की, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांचा विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्य विकास या विषयांमध्ये विशेष रस असून, या क्षेत्रातील उपक्रमांना ते सातत्याने प्रोत्साहन देत आहेत. त्यांच्या संकल्पनेतूनच जिल्हा नियोजन मंडळामार्फत अहिल्यानगर शहरात इन्क्युबेशन व इनोव्हेशन सेंटर सुरू करण्यासाठी पाच कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या केंद्रासाठीचा तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव सध्या महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीकडे असून, लवकरच प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर उभारणीस प्रारंभ होणार आहे. जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी कृषी विकास व सौरऊर्जेवर आधारित विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले आहेत. या प्रकल्पांना जिल्हा उद्योग केंद्र व एमआयडीसीतील उद्योजकांशी जोड दिल्यास भविष्यात सक्षम व कुशल तंत्रज्ञ निर्माण होतील. अशा प्रकारची तंत्रकौशल्यावर आधारित प्रदर्शने मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्याची गरज असून, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत आपण पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिले. प्रास्ताविकात प्राचार्य खालीद जहागीरदार म्हणाले की, प्रदर्शनासाठी १४ तालुक्यांमधून ८४ प्रकल्पांची निवड करण्यात आली असून, या जिल्हास्तरीय प्रदर्शनातून विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी प्रकल्पांची निवड करण्यात येणार आहे. सूत्रसंचालन अभिजित ताठे यांनी केले. परीक्षक म्हणून सागर भंडारी, अमित काळे, सोमनाथ जाधव, पूजा पतंगे व शेवाळे यांनी काम पाहिले.

# रतनबाई शिंदे यांचे निधन



**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील रतनबाई बबन शिंदे (वय ६३) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या भारतीय सेनेतील निवृत्त मेजर ओमप्रकाश शिंदे यांच्या मातोश्री होत.

# रस्त्यांवरील अपघातात जखमी वा मृत्यू झाल्यास मिळणार नुकसान भरपाई

## ▌प्रशासक डांगे यांचे अर्ज करण्याचे आवाहन
## ▌महापालिकेचा महत्त्वपूर्ण निर्णय

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हद्दीत विकसित करण्यात आलेल्या रस्त्यांवरील खड्डे अथवा रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघात होऊन नागरिक जखमी झाल्यास किंवा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास संबंधित नागरिकांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी नुकसानभरपाईसाठी अर्ज सादर करावा, असे आवाहन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.




मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक ६१/२०१३ मध्ये दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, महापालिकेमार्फत विकसित रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघातात जखमी किंवा मृत्यू झालेल्या प्रकरणांमध्ये योग्य चौकशी करून नुकसानभरपाईबाबत कार्यवाही केली जाणार आहे. यासाठी संबंधितांनी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत, नवीन प्रशासकीय इमारत, पावन गणपती मंदिर शेजारी, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे सर्व पुराव्यांसह अर्ज सादर करावा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत या अर्जांवर योग्य ती कार्यवाही केली जाईल, असेही डांगे यांनी स्पष्ट केले आहे. या महत्त्वपूर्ण सूचनेची सर्व अहिल्यानगरकर नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर नोटिशीद्वारे करण्यात आले आहे.




# समर्थ रामदास स्वामी पादुकांचे गोंदवलेकर महाराज मंदिरात स्वागत

**अहमदनगर । विजय मते**

सातारा जिल्ह्यातील सज्जनगड येथील श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे गुरुवार, ता. २२ रोजी सकाळी ११ वाजता शिलावीहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात आगमन झाले. यावेळी सेवाभावी मंडळाच्या वतीने सुंदरदास रिंगणे यांनी पादुकांचे मंगलवाद्यांच्या निनादात पुष्पवृष्टी करत स्वागत केले. यावेळी पादुकांना अभिषेक करण्यात आला. अक्षय क्षीरसागर यांनी पौराहित्य केले. अहिल्यानगरात श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचा ता. १९ जानेवारी ते २८ पर्यंत प्रचार दौरा व भिक्षा फेरी होत आहे. राष्ट्रगुरू श्रीसमर्थ रामदास स्वामी यांच्या विचार व कार्याची महती अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. कर्म, उपासना, ज्ञान आणि मोक्ष या चतु:सूत्रीवर आधारित कर्मनिष्ठ जीवनप्रणालीचा प्रचार व प्रसार करण्याच्या मुख्य हेतूने श्रीक्षेत्र सज्जनगडावरून श्री रामदास स्वामी संस्थानतर्फे भिक्षा दौरा आयोजित केला जातो. आज या दौऱ्याचे अहिल्यानगरात ठिकठिकाणी स्वागत होत आहे. सावेडी उपनगरात शिलावीहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात या पादुकांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी रेखा रिंगणे, प्रसाद रिंगणे, अशोक मुळे, चंद्रशेखर गटणे, सुभाष भंडारी, दीक्षित, डॉ. अनिकेत घोटणकर, पुरुषोत्तम बेंद्रे, रवींद्र कुलकर्णी, यशवंत आंबेकर, राहुल लिमये, विजय मते आदींसह सेवाभावी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# न्यू आर्टस् महाविद्यालयात भव्य ग्रंथप्रदर्शन



**अहमदनगर । रयत समाचार**

न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने गुरुवार, ता. २२ व शुक्रवार, ता. २३ रोजी भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सहसचिव मुकेश मुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. सागडे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. एस. बी. कळमकर, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, ग्रंथालय समितीचे चेअरमन डॉ. एच. डी. जगताप, ग्रंथपाल संगीता निमसे, प्रबंधक बी. के. साबळे, अधीक्षक आर. एन. पाटील, अधीक्षक जे. जी. सावळे व उपक्रम समिती सदस्य, महाविद्यालयाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय सेवकवृंद तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी मुळे यांनी ग्रंथालय विभागाचे विशेष कौतुक केले. आजच्या मोबाईल-इंटरनेटच्या युगात वाचकांची संख्या कमी होत असली तरी साहित्य वाचनाने व्यक्तीच्या जीवनात आमूलाग्र बदल होतो, त्यासाठी नियमित वाचन केले पाहिजे, असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. बी. बी. सागडे यांनीही ग्रंथप्रदर्शनात अत्यंत उपयुक्त ग्रंथसंग्रह असल्याचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना अध्ययन व ज्ञानार्जनासाठी निश्चितच उपयोग होईल, असे सांगितले. ग्रंथप्रदर्शनास संस्थाचालक, प्राध्यापक, संशोधक, प्रशासकीय सेवकवृंद तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भरघोस प्रतिसाद दिला. ग्रंथप्रदर्शन यशस्वीतेसाठी सविता डांगे, चेतन साळवे, श्रीराम बनसोड, विजय म्हस्के, के. एन. मते व इतर ग्रंथालय सेवकवृंद यांनी परिश्रम घेतले.

# रसिकांचे प्रेम हीच कलाकारांची खरी ऊर्जा- अभिनेते मुंडवाडकर

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

ध्यानीमनी नसताना स्वामी समर्थांची भूमिका साकारण्याची संधी मिळाली. या भूमिकेमुळे प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळाले. प्रेक्षकांचे प्रेम हीच कलाकारांसाठी खरी ऊर्जा असते, असे प्रतिपादन कलर्स मराठी वाहिनीवरील स्वामी समर्थ मालिकेतील मुख्य भूमिकेतील अभिनेते अक्षय मुंडवाडकर यांनी केले. बेळगाव येथील स्वामी समर्थ भक्त परिवाराच्या वतीने संत गाडगेबाबा भवन येथे बुधवारी सायंकाळी कला गौरव सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या "स्वामी समर्थ" या मालिकेतील स्वामींची भूमिका करणारे कलाकार अक्षय मुंडवाडकर आणि चोळापाची भूमिका करणारे नचिकेत जोग यांचा बेळगावचे महापौर मंगेश पवार यांच्या हस्ते शाल, स्मृतीचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन कला गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, नगरसेवक गिरीश धोंगडी, मीना बेनके, चंद्रकांत कापसे, डॉ. अशोक खोबरे आदी मान्यवर उपस्थित होते. याचप्रसंगी




बेळगावात ज्या ज्या ठिकाणी पालखी परिक्रमेचे आयोजन केले जाते तेथील मुख्य आयोजक हट्टिहोळ गल्ली मोहन लाड, महाद्वार रोड स्वामी समर्थ आराधना केंद्राचे सुनील चौगुले, गुडशेड रोड आदेश बर्डे, ओम नगर दीपक खोबरे, विनायक नगर विकास बर्डे, चिदंबर नगर सचिन सांबरेकर, कडोलकर गल्ली राजेंद्र गायकवाड, अजित कंग्राळकर, टिळकवाडी संजय शिंदे, पिरनवाडी आकाश देसाई यांच्यासह स्थानिक सेवेकऱ्यांचा अभिनेते अक्षय मुंडवाडकर आणि नचिकेत जोग यांच्या हस्ते सेवा गौरव सन्मान करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना मुंडवाडकर म्हणाले, बेळगावची माणसं कुंद्याप्रमाणे गोड आहेत. बेळगाव येथील रसिकांनी स्वामी समर्थ मालिकेला उत्स्फूर्त दाद दिली आहे. याची प्रचिती प्रत्यक्ष येथे आल्यानंतर पाहायला मिळत आहे. रसिकांकडून मिळणारी दाद हीच कलाकारांसाठी मोठी ऊर्जा असते. स्वामी समर्थ मालिकेतून छोट्या मुलांपासून तरुण पिढीपर्यंत आध्यात्मिक संस्कार रुजत आहेत, ही निश्चितच आनंदाची गोष्ट आहे. स्वामी समर्थ मालिका पाहून वाचन संस्कृतीलाही बळ मिळत आहे. स्वामी समर्थांवर नितांत श्रद्धा ठेवा आणि आम्हा कलाकारांना भरभरून प्रेम द्या, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी नचिकेत जोग आणि महापौर मंगेश पवार यांनी समयोचित विचार मांडले आणि पादुका पालखी परिक्रमेला शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमात उपस्थितांचे स्वागत व सूत्रसंचालन अनंत लाड यांनी केले. प्रस्ताविक स्वामी समर्थ आराधना केंद्राचे सुनील चौगुले यांनी केले. कार्यक्रमाला बेळगाव परिसरातील स्वामी समर्थ भक्त आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**



## मराठी भाषा जतन-संवर्धनाची गरज - प्रा.डॉ. मिसाळ

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**

मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा ता. १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ निमित्त मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, माका येथे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भानुदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावेडी, अहिल्यानगरचे प्राचार्य डॉ. निवृत्ती मिसाळ यांनी ''मराठी भाषा आणि समाज'' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. मिसाळ यांनी मराठी भाषेचे ऐतिहासिक महत्त्व, उगम व विकास, तिची समृद्ध परंपरा तसेच आधुनिक काळात भाषेच्या जतन व संवर्धनाची गरज यावर सखोल विवेचन केले. संत साहित्य, ग्रामीण व दलित साहित्य, लोकसाहित्य तसेच आधुनिक मराठी साहित्याचा त्यांनी आढावा घेतला. २०२४ मध्ये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर निर्माण झालेल्या नव्या संधी व जबाबदाऱ्यांवरही त्यांनी प्रकाश टाकला. दैनंदिन व्यवहारात मराठीचा अभिमानाने व अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्राजक्ता गायके यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. अमोल दहातोंडे यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन प्रा. दत्ता कोकाटे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी भाषेचा अभिमान वाढवणारे व संवर्धनाची जाणीव निर्माण करणारे हे व्याख्यान उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरले.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका आदिक-कानडे यांना मोठे आव्हान

**बेलापूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची कामगिरी अत्यंत नगण्य झाल्यामुळे या पुढच्या तालुक्यातील निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक तसेच माजी आमदार लहू कानडे यांना मोठे आव्हान आहे. श्रीरामपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत तळ्यात मळ्यात झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सपाटून मार खावा लागला.

नगरपालिकेत या पक्षाला खातेही उघडता न आल्यामुळे या पुढच्या श्रीरामपूर तालुक्यातील निवडणुकांसाठी आदिक कानडे यांना मोठे परिश्रम करावे लागणार आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या आगामी निवडणुकीमध्ये शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी एकत्रित लढणार असल्याचे सूतोवाच खासदार अमोल कोल्हे यांनी केले आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्रीरामपूर शहर आणि तालुक्यात प्राबल्य असले तरी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नेते आणि कार्यकर्त्यांची वाणवा आहे. शरद पवार यांचा सुवर्णकाळ असताना श्रीरामपूर शहर आणि तालुक्यात तसेच जिल्हा आणि राज्यात मोठा गवगवा होता. सद्यस्थितीत या पक्षाला येथे कार्यकर्त्यांची मोठी वानवा आहे. माजी आमदार कानडे यांनी वर्षभरापूर्वी श्रीरामपूर तालुक्यात गाव तेथे राष्ट्रवादीची शाखा उघडली आहे. कानडे या तालुक्याचे प्रतिनिधित्व करत असताना त्यांनी मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायतीच्या सत्ता हस्तगत केल्या आहेत. अविनाश आदिक आणि लहू कानडे यांना मानणारा ग्रामीण भागात कार्यकर्त्यांचा ही संच मोठा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अरुण पाटील नाईक हा सुस्पष्ट आणि कोरा चेहरा आदिक, कानडे यांच्याकडे आजही सक्रिय आहे. नाईक यांचा तळागाळातील कार्यकर्त्यांशी असलेला सुसंवाद आदिक, कानडे यांच्यासाठी मोठा आधार ठरणार आहे. जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका पक्षीय चिन्हावर एकत्रित होतात का तसेच खासदार अमोल कोल्हे यांनी शरद पवार आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यापुढे एकत्रित लढणार असल्याची घोषणा श्रीरामपूर तालुक्यात कशी फळाला येते त्यासाठी निवडणुकीची घोषणा होऊ द्यावी लागणार आहे. एकंदरीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीबरोबरच इतरही काही निवडणुका श्रीरामपूर तालुक्यात आदिक कानडे यांना आव्हान ठरणार आहेत.







# केंद्रीय पोलीस दलात जुळ्या भावंडांची निवड

## देवगड विद्यालयाकडून सत्कार

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

देवगड माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी सूरज राजेंद्र पावसे याची सीआयएसएफ आणि धिरज राजेंद्र पावसे याची सीआरपीएफमध्ये निवड झाली. या जुळ्या भावंडांची निवड ही विद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. पावसे बंधू २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी असून, त्यांनी मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केल्याबद्दल देवगड विद्यालयाच्या वतीने त्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अभ्यासाबरोबरच क्रीडा स्पर्धा व विविध उपक्रमांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. शिस्त, राष्ट्रप्रेम, नेतृत्वगुण आणि शारीरिक तंदुरुस्ती यांचा समतोल साधत त्यांनी आपली जडणघडण केली. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणातून देशसेवेची प्रेरणा अधिक दृढ झाली आणि त्याच प्रेरणेतून त्यांनी केंद्रीय पोलीस दलात भरती होण्याचे उद्दिष्ट निश्चित केले. यासाठी आवश्यक असणारा मैदानावरील सराव उपयुक्त ठरला. यावेळी देवगड विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा उगले, संदीप पावसे, नेहे व्ही. आर., माने एम. ए., तातळे एस. एम., राहाणे आर. बी., वाघ एस. डी., थोरात डी. डी., कुदळ ए. एस., कातोरे, वर्पे एस. डी., शिरतार एस. एस., पवार एस. बी., भालेराव आर. ए. यांच्यासह विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



**कठोर लेखी परीक्षा, शारीरिक चाचण्या आणि मुलाखतींच्या अनेक टप्प्यांतून यशस्वीरीत्या मार्ग काढत सूरज पावसे आणि धिरज पावसे यांनी हे यश मिळवले. या संपूर्ण प्रक्रियेत त्यांनी परिस्थितीवर मात करून सातत्याने कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वास यांचा आदर्श निर्माण केला.**

# डॉ. भालसिंग यांचा भंडारी हॉस्पिटलमध्ये गौरव



**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

ग्रामीण व शहरी भागातील आरोग्यसेवेला अर्धशतकाहून अधिक काळ समर्पित योगदान देणारे ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ. आसाराम भालसिंग (रा. वाघोली ता. शेवगाव) यांचा ५० वर्षांच्या यशस्वी शस्त्रक्रियांच्या कारकिर्दीनिमित्त भंडारी हॉस्पिटल, पाथर्डी येथे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

सन १९८८ ते १९९५ या कालावधीत त्यांनी पाथर्डी येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक म्हणून अत्यंत उत्कृष्ट व लोकाभिमुख कार्य केले. त्यानंतर अहिल्यानगर, लातूर व नाशिक येथील जिल्हा रुग्णालयांमध्ये सिव्हिल सर्जन म्हणून जबाबदारी सांभाळताना त्यांनी आरोग्यसेवेला नवे परिमाण दिले.

पाथर्डी, शेवगाव, रायमोह यांसारख्या ग्रामीण भागात अद्ययावत सुविधा नसतानाही, डॉ. भालसिंग यांनी अनेक गरीब व गरजू रुग्णांवर मोफत तसेच अत्यंत माफक दरात शस्त्रक्रिया करून रुग्णांना जीवनदान दिले. गेल्या २७ वर्षांपासून भंडारी हॉस्पिटलमध्ये दर रविवारी ते गरजू रुग्णांसाठी नियमितपणे शस्त्रक्रिया करत असून, ही परंपरा आजही अखंड सुरू आहे.

त्यांचे वैद्यकीय निदान अत्यंत अचूक असून, ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज नाही, अशा अनेक रुग्णांना केवळ औषधोपचारातून बरे करून त्यांनी नवी आशा दिली आहे. ७ जानेवारी १९७६ रोजी पहिली शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांच्या वैद्यकीय सेवेला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. वयाच्या या टप्प्यावरही ते आजही विविध खाजगी रुग्णालयांत नियमित शस्त्रक्रिया करत आहेत, हे विशेष उल्लेखनीय आहे. लातूर व अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयामध्ये सिव्हिल सर्जन असताना त्या रुग्णालयांना राज्य शासनाचा आनंदीबाई जोशी पुरस्कार मिळाला. पाथर्डी येथे होणाऱ्या शस्त्रक्रियांमध्ये डॉ. आर. पी. कुलकर्णी व डॉ. अमोल दरोडे यांनी भूलतज्ज्ञ म्हणून मोलाचे सहकार्य केले.

या गौरव सोहळ्यात ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक डॉ. विलास बाहेती यांच्या हस्ते डॉ. भालसिंग यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ. अभय भंडारी, डॉ. सोनाली भंडारी, डॉ. ज्योती देशमुख, डॉ. श्रीधर देशमुख, डॉ. अमोल दरोडे,डॉ. पूर्वा भंडारी, डॉ. लालजी जोशी आदी उपस्थित होते. डॉ. आसाराम भालसिंग यांची ही अर्धशतकाची रुग्णसेवा ग्रामीण आरोग्य व्यवस्थेसाठी दीपस्तंभ ठरणारी असून, त्यांचा हा प्रवास भावी वैद्यकीय पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

**डॉ. भालसिंग यांनी आजवर सुमारे एक लाख ४६ हजारांहून अधिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या असून, वैद्यकीय क्षेत्रातील हा एक दुर्मिळ आणि प्रेरणादायी विक्रम मानला जात आहे. त्यांनी आपले एमबीबीएस व एम.एस. (सर्जरी) शिक्षण बी.जे. मेडिकल कॉलेज व ससून रुग्णालय, पुणे येथे पूर्ण केले.**

# गो-आधारित सेंद्रिय शेती ही काळाची गरज- डॉ. कौशिक

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

देशी गायींचे दूध, शेण व गोमूत्र यांचा शास्त्रीय व योग्य वापर केल्यास जमिनीची सुपीकता वाढते, उत्पादन खर्च कमी होतो आणि शेती अधिक नफ्याची बनते.

रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची गुणवत्ता घटत असताना गो-आधारित सेंद्रिय शेती ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन दहिगावने येथील कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्यामसुंदर कौशिक यांनी केले. भगूर (ता. शेवगाव) येथील मृदगंध सेंद्रिय फार्म तथा देशी गोसंवर्धन केंद्रातील गोमाता नवीन वास्तूचे उद्घाटन डॉ. कौशिक यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील होते.

यावेळी मंडलाधिकारी शीतल नागवडे, उपकृषी अधिकारी प्रकाश कांबळे व सुखदेव जमधडे, शास्त्रज्ञ डॉ. सचिन बडधे, डॉ. माणिक लाखे, नगरसेवक निलेश रोकडे, डॉ. चंद्रशेखर गवळी आदी उपस्थित होते. डॉ. उमेश पाटील म्हणाले की, मृदगंध देशी गोसंवर्धन केंद्राचा उपक्रम उल्लेखनीय असून गोपालन आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी चळवळ बनली पाहिजे.

शासनाच्या विविध योजना व तांत्रिक मार्गदर्शन पशुसंवर्धन विभागामार्फत उपलब्ध आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्याणी मुरदारे यांनी केले. सूत्रसंचालन कांचन मुरदारे यांनी केले तर कैलास मुरदारे यांनी आभार मानले. यावेळी ऋतुराज मुरदारे, सुरेश मुरदारे, अनिल वावरे, संतोष काकडे, उद्धव मुरदारे, रेवनाथ बर्डे, रावसाहेब मुरदारे, विनोद गाडगे, जितेंद्र भगत, चंद्रकांत कदम यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**डॉ. कौशिक म्हणाले, गोमातेपासून मिळणारे शेण, गोमूत्र, पंचगव्य, सेंद्रिय खते, औषधे, अगरबत्ती, दीपक आदी मूल्यवर्धित उत्पादने तयार करून रोजगारनिर्मिती शक्य आहे. कृषी विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांना सातत्याने शास्त्रीय मार्गदर्शन दिले जात असून त्यांनी त्याचा लाभ घ्यावा.**

## उमेदची वाचन चळवळ राज्यभर जाईल - अनंत कराड

**शेवगाव । नरहरी शहाणे**

मोबाईलमुळे व्यस्त होत चाललेल्या मनाला वाचन संस्कृतीकडे वळवण्यासाठी वाचन चळवळ यशस्वीतेकडे झेपावत आहे. ज्ञानाच्या कक्षा वाढवायच्या असल्यास वाचन संस्कृतीला बळकटी देऊन ती जोपासली पाहिजे. उमेदच्या वाचन चळवळीला असे उपक्रम गती देतात. उमेदचे उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत असून ही वाचन चळवळ राज्यव्यापी होईल, असे मत साहित्यिक अनंत कराड यांनी व्यक्त केले. शेवगाव तालुक्यात उमेदच्या माध्यमातून पंचायत समिती शेवगावचे शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर यांच्या संकल्पनेतून व दत्तात्रय केसभट यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच वर्तमानपत्र, मासिक, साप्ताहिक तसेच विविध संग्रहित कात्रण चिकट वही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून कराड बोलत होते. यावेळी त्यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगून बालपणापासूनच ही सवय जीवनभर जपली गेली पाहिजे, असे सांगितले. थोरामोठ्यांची जीवनचरित्रे अभ्यासली पाहिजेत, ती जीवन जगण्याची ऊर्जा देतात. त्यामुळे वाचन महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी मांडले. यावेळी विचारमंचावर विस्तार अधिकारी शंकर गाडेकर, गोरक्षनाथ दातीर, लोकशक्तीचे विजय लेंडाळ, दत्तात्रय केसभट, प्रमोद कातकडे, गहिनीनाथ बडे, खंडू वाघमारे उपस्थित होते. स्पर्धेसाठी जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील शाळेतील अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर पाटील व अर्चना पटारे यांनी केले तर प्रास्ताविक दत्तात्रय केसभट यांनी केले आणि आभार अमोल कांबळे यांनी मानले.



**पारितोषिक विजेते**

**जिल्हा परिषद प्राथमिक काळेगाव (भायगाव) शाळेचा विद्यार्थी चैतन्य शाहराम आगळे याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक क्षितिजा अतुल बडे (बालंबिकानगर शाळा) तर तृतीय क्रमांक ऋषिकेश अभिमन्यू नाकाडे (शोभानगर शाळा) यांना मिळाला. प्रथम क्रमांकासाठी १००१ रुपये रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प, द्वितीयसाठी ५०१ रुपये रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प तर तृतीयसाठी २०१ रुपये रोखचे बक्षीस ठेवण्यात आले होते. वेगवेगळ्या गटातील सर्वच स्पर्धकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.**

# शासकीय आश्वासन हवेतच

## उडीद खरेदी रखडली, शेतकरी व्यापाऱ्यांच्या दयेवर

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शासनाने हमीभावाचे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी उडीद पिकाची लागवड केली; मात्र प्रत्यक्षात शासकीय खरेदी सुरू न झाल्याने हे आश्वासन कागदापुरतेच राहिले आहे. शासनावर विश्वास ठेवून पिकवलेला उडीद आज शेतकऱ्यांच्या अंगणात पडून आहे, तर बाजारात खासगी व्यापाऱ्यांनी दर मनमानीने कोसळवले आहेत.

शेवगाव तालुक्यात शासनाने पाच शासकीय खरेदी केंद्रे जाहीर केली आहेत. प्रत्येक केंद्रावर सुमारे पाच हजार शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. मात्र नोंदणी करूनही प्रत्यक्ष खरेदी सुरू नसल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडली आहे. नाईलाजाने शेतकरी खासगी व्यापाऱ्यांकडे धाव घेत असून त्याचा फायदा व्यापाऱ्यांना होत आहे. खरेदी केंद्रांवर चौकशी केली असता, ''शासनाकडून माल खाली करून घेतला जात नाही, त्यामुळे आम्ही खरेदी करू शकत नाही,'' असे उत्तर शेतकऱ्यांना मिळत आहे.

या गोलमोल भूमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शासनाने दिलेल्या हमीप्रमाणे तात्काळ उडीद खरेदी सुरू करावी, अन्यथा शेतकऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रेय फुंदे यांनी दिला आहे. शासनाने वेळीच निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांचे बैल थेट तहसीलदार कार्यालयात बांधून निषेध व्यक्त केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. शासनाच्या उदासीनतेमुळे उडीद उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला असून, आता सरकार हस्तक्षेप करणार की शेतकऱ्यांचा संयम संपेपर्यंत वाट पाहणार, असा सवाल ग्रामीण भागातून उपस्थित होत आहे.

**इतर राज्यांमध्ये उडीदाची शासकीय खरेदी प्रतिक्विंटल सुमारे ७,८०० रुपये दराने सुरू असताना, महाराष्ट्रात शासकीय केंद्रांवर अद्याप एक दाणाही खरेदी झालेला नाही. परिणामी शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला असून खासगी व्यापारी ४ ते ५ हजार रुपये प्रतिक्विंटल इतक्या अत्यल्प दरात उडीद उचलत आहेत. हमीभावाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या घामाची लूट सुरू असल्याचा आरोप होत आहे.**



# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब

आज २३ जानेवारी, हिंदू हृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची १००वी जयंती. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री



प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी मार्मिक हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले शिवसेना यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई – पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या जयंती दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# राजा प्रजेच्या दुःखाने दुःखी झाला तर ती ईश्वराने राष्ट्राला दिलेली देणगी

## रामराव ढोक महाराज यांचे प्रतिपादन

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना खताची गोणी फाडून त्यात काय आहे हे पाहण्याचा अधिकार त्याला ठेवला नाही. खताची गोणी आपल्या पैशाने विकत घ्यायची आणि त्यात माती किंवा विटांचा चुरा भरला आहे की काय हे न पाहता आपल्या शेतात ते टाकायची अशी अवस्था आहे. शेतकरी आता मंदिरात जातो, रडतो, प्रार्थना करतो की देवा मी निसर्गापेक्षा शासनकर्त्यांना सहन केलंय. शेतकरी पाण्यात कमी आणि त्याच्या अश्रूंमध्ये जास्त वाहून गेलाय. राजा जर प्रजेच्या दुःखाने दुःखी झाला तर समजायचे की ती ईश्वराने राष्ट्राला दिलेली देणगी आहे, असे प्रतिपादन रामायणाचार्य रामराव महाराज ढोक नागपूरकर यांनी केले.

पाथर्डीचे भूमिपुत्र तथा भोसरी–चाकण येथील उद्योगपती भारत सातपुते यांच्या ६१ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित जाहीर संकीर्तनामध्ये ते बोलत होते. यावेळी आमदार मोनिका राजळे, श्रीक्षेत्र तारकेश्वर गडाचे महंत ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री, शब्दगंध साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, माजी उपसभापती विष्णुपंत अकोलकर, सेवानिवृत्त कृषी अधिकारी प्रभाकर पाटील, इंद्रायणी नगर मित्र मंडळाचे चंद्रकांत दादा रासने, चिंबळी येथील समर्थ पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन संभाजी गवारी, शिवाजीराव गवारी, उद्योजक अशोक आहेर, रमेश साळुंखे, संभाजी दरेकर, विजय खळदकर, अशोक तनपुरे, माणिकराव पडवळ, संपत घोरपडे, सामाजिक कार्यकर्ते विनोद सपकाळ मुकुंद एकविरे, साकेगावच्या सरपंच अलका सातपुते, भायेगाव, जोहरापूर व खामगाव येथील सरपंच व सर्व ग्रामस्थ आदी उपस्थित होते. दरम्यान भोसरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विलास लांडे, तेलंगणाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक महेश भागवत, किशोर ढोकळे, संजीव शिंदे व संदीप बेलसरे यांनी त्यांना ऑनलाईन संदेश पाठवून शुभेच्छा दिल्या.

ढोक महाराज म्हणाले की, भारत सातपुते यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. तरी देखील ते आपल्या गावाला विसरले नाहीत. गावाच्या विकासासाठी त्यांनी भरीव असे योगदान दिले आहे. राजा, वेश्या, यम, बालक, अग्नी, चोर व ग्रामकंटक आदी इतरांच्या दुःखात दुःखी न होणारे आठ लोक आहेत, असे चाणक्य सांगतात. पण प्रजेच्या दुःखात जर राजा दुखी झाला झाला तर ती ईश्वरीय देणगी असते. या सोहळ्यात पाथर्डीचे भूमिपुत्र ह.भ.प. गोरक्षनाथ महाराज उदागे, यांच्या पुणे येथील ज्ञानदा संस्कृत



प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी टाळकरी सेवा दिली त्याचेही ढोक महाराजांनी तोंड भरून कौतुक केले. ते म्हणाले की, हजारो श्रोत्यांसमोर कीर्तन करणारा कीर्तनकार मोठा नाही, तर हजारो कीर्तनकार निर्माण करणारा महाराज मोठा आहे. कारण भारत सातपुते त्यांच्यासारख्या उद्योजकांना हाताशी धरून हजारो मंदिरे उभी करता येतील पण त्या मंदिरात बसून टाळ कोणी वाजवायचे ? त्यामुळे या टाळकरी मृदुंगाचार्यांना घडवणारे महाराज मोठे आहेत. ज्या व्यक्तीवर समाजाचे प्रेम आहे, जो नियोजित आयुष्य जगणारच आहे, पण त्याच्या नियोजित आयुष्यात अनिष्ट घडू नये यासाठी सर्वांनी एकत्र येऊन त्याच्यासाठी इष्ट देवाकडे केलेली सामूहिक प्रार्थना म्हणजे अभिष्टचिंतन सोहळा असतो.

यावेळी बोलताना भारत सातपुते म्हणाले की, मी, घरची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे कुटुंबासाठी काहीतरी करावे यासाठी आपले गाव सोडले. आयटीआयमुळे एका आंतरराष्ट्रीय कंपनीत कायमस्वरूपी जॉब मिळाला. नंतर नोकरी सोडून उद्योग क्षेत्रात पाऊल ठेवले व आता ब्रह्मोस इस्रोसारख्या देश संरक्षणासाठीच्या प्रकल्पात स्पेअर पार्ट बनवून देण्याचे योगदान देताना मला देशसेवेत सहभागी होण्याचे भाग्य लाभले आहे. देवाने मला आयुष्यात भरभरून दिले. निरोगी आयुष्यासह कौटुंबिक आनंदी सहजीवन दिले. मुलगी विदेशात डेटा सायंटिस्ट, जावई फेसबुक मेटामध्ये अमेरिकेत नोकरीस तर मुलगा गुगलमध्ये अभियंता म्हणून कार्यरत आहे. आपल्या आयुष्यात एक्सष्टी निमित्त गावासाठी काहीतरी करावे यासाठी आपण गावात विकास कामे सुरू केले आहेत. गावातील गुणवंतांचा सत्कार करणार आहोत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक साहेबराव सातपुते, शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, यश फाउंडेशन अहिल्यानगरचे संचालक अशोक देवढे व त्यांच्या मित्र परिवाराने परिश्रम घेतले. उद्धव काळापहाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर गोरक्षनाथ महाराज उदागे यांनी आभार प्रदर्शन केले.



# शेतीतून शिक्षणाची अनुभूती

## डॉ. हेडगेवार विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा शेतभेट उपक्रम

**प्रियोळ । रयत समाचार**

येथील प्रगतशील शेतकरी दत्ता नाईक यांच्या शेतात डॉ. के. बी. हेडगेवार उच्च माध्यमिक विद्यालय, कुजीराबांबोळी येथील जीवशास्त्र विभाग तसेच डॉ. के. बी. हेडगेवार उच्च माध्यमिक विद्यालय, कुर्टीफोंडा येथील कॉमर्स लॅबच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शेतभेट देत प्रत्यक्ष शेतीची सखोल माहिती घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी लाभली. या शेतभेटीत कुजीराबांबोळी येथील जीवशास्त्र विभागाचे विद्यार्थी तसेच शिक्षक देवानंद नाईक, दिक्षा गावकर व नताशा यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी झाले होते. तसेच कुर्टीफोंडा येथील कॉमर्स लॅबचे विद्यार्थी तसेच शिक्षक अभिषेक पार्सेकर व गंधाली प्रभुदेसाई यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित होते. दोन्ही विभागांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने शेतीकामात सहभाग घेतला. या उपक्रमातून शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून ती एक शास्त्रशुद्ध आणि व्यवस्थापन कौशल्याची प्रक्रिया आहे, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उमगले. जीवशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना पिकांची वाढ, माती व पर्यावरण यांचा अभ्यास करता आला, तर कॉमर्स लॅबच्या विद्यार्थ्यांना शेतीतील आर्थिक गणित, उत्पादनखर्च, बाजारपेठ यांची माहिती मिळाली. शिक्षकांनी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. शेतकरी दत्ता नाईक यांनी विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयी आत्मीयता निर्माण व्हावी आणि भविष्यात शेतीकडे आधुनिक दृष्टिकोनातून पाहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. हा शेतभेट उपक्रम अत्यंत यशस्वी व प्रेरणादायी ठरला असून विद्यार्थ्यांसाठी तो एक अविस्मरणीय अनुभव ठरल्याचे मत सर्व उपस्थितांनी व्यक्त केले.

**शेतकरी दत्ता नाईक यांनी विद्यार्थ्यांना भातशेतीची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवत मार्गदर्शन केले. रोपांची निवड, रोपांची लागवड, पाणी व्यवस्थापन, मातीची तयारी, पारंपरिक व आधुनिक शेतीपद्धती, खर्च व उत्पादन याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी चिखलात उतरून रोपांची लागवड, जमीन समतल करणे यांसारखी कामे प्रत्यक्ष अनुभवली. त्यामुळे शेतीतील कष्ट, नियोजन व शिस्त याचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आले.**

# तालुकास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत बलराम विद्यालय 'चॅम्पियन'



**काणकोण । रयत समाचार**

देवाबाग–काणकोण येथे झालेल्या काणकोण तालुकास्तरीय आंतरशालेय ॲथलेटिक्स स्पर्धेत आमोणे–पैंगीणच्या बलराम निवासी विद्यालयाने सर्व वयोगटांत उत्कृष्ट कामगिरी करत चॅम्पियनशिप पटकावून आपली क्रीडाशक्ती सिद्ध केली. या शाळेच्या खेळाडूंनी एकूण ३२ पदके मिळवली असून त्यामध्ये ९ सुवर्ण, १२ रौप्य आणि ११ कांस्य पदकांचा समावेश आहे. १७ वर्षांखालील मुले: ओंकार दैकर (८०० मी. धावणे – प्रथम), वेदांत गावकर (उंच उडी – प्रथम), (लांब उडी – द्वितीय), (११० मी. अडथळा शर्यत – द्वितीय), आर्यन गावकर (ट्रिपल जंप – तृतीय), अंकुश वेळीप (ट्रिपल जंप – तृतीय), विघ्नेश गावकर (डिस्कस थ्रो – द्वितीय), श्रुतिक गावडे (५ कि.मी. चालणे – तृतीय), ओंकार, वेदांत, कृणाल व दक्ष (४१०० मी. रिले – प्रथम). १७ वर्षांखालील मुली: प्राची वेळीप (८०० मी., १५०० मी., ३ कि.मी. धावणे – प्रथम), साक्षी रायकर (११० मी. अडथळा, ४०० मी. अडथळा शर्यत – प्रथम), अंबानी गावकर (११० मी. अडथळा शर्यत – द्वितीय, ४०० मी. अडथळा शर्यत – तृतीय), सायशा वेळीप (ट्रिपल जंप – द्वितीय), रश्मी वेळीप (१०० मी., २०० मी. धावणे – द्वितीय), ऋतिका वेळीप (३ कि.मी. धावणे – तृतीय), क्रांती वेळीप (८०० मी. धावणे – तृतीय), सान्वी वेळीप (भालाफेक – तृतीय), रश्मी, रिचा, श्रीशा व प्राची (४१०० मी. रिले – तृतीय). १४ वर्षांखालील मुले: जयदीप गावकर (१०० मी. धावणे – तृतीय), हेरंब कोडारकर (गोळाफेक – द्वितीय). १४ वर्षांखालील मुली: कृपा वेळीप (१०० मी. धावणे – द्वितीय), छाया वेळीप (४०० मी., ६०० मी. धावणे – प्रथम), अक्षिता कण्यनार (४०० मी. धावणे – तृतीय), साक्षी वेळीप (८० मी. अडथळा – द्वितीय, ६०० मी. अडथळा – तृतीय), साक्षी, छाया, कृपा व दिशा (४१०० मी. रिले – द्वितीय). या दैदीप्यमान यशाबद्दल शाळा व्यवस्थापनाने समाधान व्यक्त केले आहे. मुख्याध्यापिका सविता तवडकर, क्रीडा शिक्षिका केसर गावकर, सुशांत वैज तसेच सर्व शिक्षकवृंद व पालकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# पीईएसची आदर्श वसाहत

**स्मृतिवार्ता । रयत समाचार**

बाबासाहेबांची अपूर्ण राहिलेली स्वप्नवत योजना. पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी एक आदर्श वसाहत.– डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीमधील औरंगाबाद येथील संस्थेत काम करणाऱ्या प्राध्यापक, शिक्षक आणि सर्व लहान–मोठ्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र कॉलनी उभारण्याची सुस्पष्ट आणि दूरदृष्टीपूर्ण योजना आखली होती. या वसाहतीत कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज निवास व्यवस्था. लहान मुलांच्या संगोपन व विकासासाठी विशेष सुविधा. दैनंदिन गरजांसाठी प्रोव्हिजन स्टोअर. संध्याकाळी विचारांची देवाण–घेवाण होण्यासाठी मध्यवर्ती विचार–क्लब. नियतकालिके, वाचनाची सोय. टेनिस, बॅडमिंटनसारख्या खेळांची व्यवस्था. जीवनावश्यक वस्तूंसाठी बाहेर जाण्याची गरज भासू नये, अशी स्वयंपूर्ण रचना. इतकेच नव्हे तर शिक्षक, कर्मचारी व प्राध्यापकांसाठी कोणकोणत्या प्रकारच्या इमारती असाव्यात यांचे नकाशे स्वतः बाबासाहेबांनी तयार करून घेतले होते. इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा तपशील म्हणजे ''वसाहतीसाठी बँकेत मी ५ लाख रुपयांची व्यवस्था केली आहे. हे सर्व पैसे वसाहत उभारण्यासाठी तुझ्याच हातात देणार आहे.'' असे बाबासाहेबांनी त्यांचे विश्वासू सहकारी बळवंत हणमंतराव वराळे यांना सांगितले होते. ही वसाहत उभारण्यासाठी सध्याच्या कॉमर्स कॉलेजच्या बाजूला असलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटीची मोकळी जागा निश्चित करण्यात आली होती.

**संदर्भ : डॉ.आंबेडकरांचा सांगाती, लेखक : बळवंत हणमंतराव वराळे बाबासाहेबांचे हे दुर्लक्षित स्वप्न अधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन.**

**टीप : खालील इमेज ही ए आय निर्मित असून बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित, पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी कल्पिलेल्या आदर्श वसाहतीची संकल्पनात्मक प्रतिकृती आहे, ती प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या रचनेचा फोटो नाही.**

